**प्रेस नोट दिनांक ०४/०४/२०१९**
**चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर**
**लोकसभा निवडणुकीसंबधाने हद्यीत रुट मार्च केले बाबत.**

चंदननगर पो.स्टे. हद्यीत दिनांक ०३/०४/२०१९ रोजी सायंकाळी १८.०० ते १९.३० वा. दरम्यान लोकसभा २०१९ चे निवडणुकीचे अनुषंगाने रुट मार्चचे आयोजन केले होते. सदर रुट मार्चमध्ये चंदननगर पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच येरवडा विभागातील पोलीस ठाणेतील अधिकारी, कर्मचारी व आरसीपी ४ यांचेसह रुट मार्च काढण्यात आला. सदर रुट मार्च चंदननगर पोलीस स्टेशन येथुन सुरु होऊन सुंदराबाई मराठे शाळा- आंबेडकर झोपडपट्टी वसाहत- संघर्ष चौक- छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, चंदननगर- सराफ बाजार- टाटा गार्डरुम- जुना मुंढवा रोडने व्दारका गार्डन मंगल कार्यालय- सुंदराबाई मराठे शाळा व तेथुन संभाजी चौक, गणेशनगर- आनंद पार्क बस स्टॉप- क्रेन रडार कंपनी- जुना मुंढवा रोडने कुबा मस्जिद व परत चंदननगर पोलीस स्टेशन असा ३.५ किमी अंतर आयोजित केला होता. रुट मार्चमध्ये पो.नि. २, सपोनि/पोउनि. ५ व पोलीस कर्मचारी ४९ यांचेसह पिटर मोबाईल, वन मोबाईल, टु मोबाईल, मार्शल टु व्हिलर यांचा सहभाग होता. रुट मार्च दरम्यान लोकसभा - २०१९ अनुषंगाने आदर्श आचार संहिता भंग होणार नाही याची दक्षता घेण्याच्या योग्य सुचना देवुन नागरीकांच्या सुरक्षिततेबाबत, सुरळीत वाहतुकीकरीता वाहन चालक, दुकानदार, पादचारी, पथारी व्यवसायीक यांना मेगा फोनव्दारे योग्य त्या सुचना देण्यात आल्या आहेत.



